सत्यमेव जयते

DIVYA AADHAR

https://epaper.divyaaadhar.com

साप्ताहिक

# दिव्य आधार

rizwanshaikhekmat33@gmail.com

संपादक : शेख रिजवान मो. 9561840184



ग्राऊंड रिपोर्टींग
पान ४ वर

बीड वर्ष १३ वे, अंक ४६, सोमवार, दि. १३ जुलै २०२६ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया

# सर्वे नंबर ३५ मध्यवस्तीतील जागेचा लेआऊट घोटाळा

## पहिले लेआऊट रद्द न करता दुसऱ्या लेआऊटला सन २०२५ साली मंजूरी

**बीड । दिव्य रिपोर्टर**

शहराच्या मध्यवस्तीत सर्वे नंबर ३५ मधील जागेत पूर्वी लेआऊट केलेले असताना संबंधित मालकाने नगरप्रशासनाच्या काही अधिकाऱ्यांना मॅनेज करून पुन्हा दुसरे लेआऊट मंजूर करून घेतल्याची खळबळजनक माहिती समोर आली असून सदरील दुसरे लेआऊट २०२५ साली मंजूर करण्यात आले होते. दुसरे नियमबाह्य लेआऊट मंजूर करून देण्यासाठी तत्कालीन अधिकारी व तत्कालीन नगररचनाकार यांनी लाखो रुपयांचा आर्थिक व्यवहार केल्याची शंका असून याप्रकरणी चौकशीसाठी समिती गठीत झाली होती परंतु त्या समितीने काय अहवाल दिला? तो अहवाल मात्र गुलदस्त्यातच आहे. या गंभीर प्रकरणाची पुन्हा चौकशी व्हावी

### याप्रकरणाची चौकशीसाठी समिती गठित करण्यात आली होती, अहवाल मात्र गुलदस्त्यात

### दुसरे लेआऊट नियमबाह्य पद्धतीने करून देण्यासाठी अधिकारी व तत्कालीन नगररचनाकार यांनी लाखो रुपयांचा आर्थिक व्यवहार केल्याची शंका

### एसआयटी पथकाकडून विशेष चौकशी करणे गरजेचे

अशी सर्वसामान्यातून मागणी होत असून यासाठी आता एसआयटी पथक स्थापन करणे गरजेचे वाटते.

शहराच्या मध्यवस्तीत सर्वे नंबर ३५ मध्ये अंदाजे पाच एक्कर जागा होती. ती जागा संबंधित मालकाने लेआऊट करून घेतलेली होती. लेआऊट करून घेतल्यानंतर त्या काळात त्या जमिनीतून १२ ते १७ प्लॉट ग्राहकांना अधिकृत खरेदीखताच्या आधारे विक्रीही करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात नगरप्रशासनाने या जमिनीवर आरक्षण टाकल्यानंतर ते आरक्षण हटविण्यासाठी नगरप्रशासनाच्या काही अधिकाऱ्यांना हाताखाली घेवून प्रयत्नही झाले होते. त्यानंतर पुन्हा त्या जागेचे लेआऊट करण्यात आले. विशेष म्हणजे पहिले लेआऊट मंजूर असताना ते लेआऊट रद्द न करता पुन्हा




त्या जागेचे लेआऊट केल्याने नगरप्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह लागले. ज्या व्यक्तींनी पूर्वी प्लॉट खरेदी केले होते त्यांच्या जमिनीच्या चतुसिमा जाणीवपूर्वक बदलल्या गेल्या, यासाठी काही ग्राहकांनी न्याय मिळविण्यासाठी कोर्टात धाव घेतली. कोर्टातून नुकतेच याप्रकरणी एका ग्राहकाचा निकाल लागला असून त्या निकालमधून मोठी खळबळ उडाली आहे. लवकरच याप्रकरणी लेआऊटचा महाघोटाळा उघडकीस येण्याची शक्यता असून बडा मासा कायद्याच्या गळाला लागला अशी चर्चा जोरात आहे.

### चुकीच्या पद्धतीने दोन-दोन लेआऊट करणाऱ्याला न्यायालयाचा दणका

सर्वे नंबर ३५ या जागेचे दोन-दोन लेआऊट केल्याची बाब समोर आल्यानंतर काही प्लॉट घेणाऱ्या ग्राहकांच्या चतु:सिमा बदलल्या गेल्या. त्यामुळे काही ग्राहकांनी न्यायालयात धाव घेतली. काही दिवसांपूर्वी न्यायालयाने याप्रकरणी एक निकाल दिला असून पूर्वीच्या लेआऊटनुसार प्लॉट खरेदी केलेल्या व्यक्तीच्या बाजूने हा निकाल लागला असून सर्वे नंबर ३५ चे चुकीच्या पद्धतीने दोन लेआऊट करणाऱ्याला न्यायालयाने चांगलाच दणका दिला असून सर्वे नंबर ३५ मध्ये बोगसपणे आणि तांत्रिकपणे गोलमाल करणाऱ्या व्यक्तीवर इतर ठिकाणीही गुन्हे दाखल असल्याची चर्चा असून लवकरच दिव्य आधार या प्रकरणी मोठी पोलखोल करणार आहे.

### पहिले लेआऊट असताना दुसरे लेआऊट करणाऱ्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करा

ज्याअर्थी सर्वे नंबर ३५ या मध्यवस्तीतील जागेचे पूर्वीच लेआऊट झालेले होते, मालकांनी त्या लेआऊटच्या नुसार प्लॉटही विक्री केले होते. त्यानंतर संबंधित जागा मालकाने स्वत:ची सोय पाहून नगरप्रशासनाच्या काही अधिकाऱ्यांना हाताखाली घेवून सन २०२५ मध्ये नगररचनाकार यांच्या संगनमताने सर्वे नंबर ३५ च्या त्या जागेचे दुसरे लेआऊट केले असल्याची शंका असून जर पूर्वीचे लेआऊट रद्दच झाले नव्हते तर दुसरे लेआऊट झाले कसे? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला असून जर यात अधिकारी सामील असतील तर अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर एफआयआर करणे अपेक्षित आहे.

# सुरक्षा एजन्सीवर लाखोचा खर्च तरीही विश्रामगृहाची सुरक्षा वाऱ्यावर

**बीड । दिव्य रिपोर्टर**

जिल्ह्यातील शासकीय कार्यालयाच्या सुरक्षेसाठी खासगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केली जात आहे. काही खासगी सुरक्षारक्षक एजन्सींना शासकीय कार्यालयाच्या सुरक्षेची जबाबदारी देण्यात येत असून या सुरक्षापोटी प्रशासन सुरक्षा एजन्सींना दर महिन्याला लाखो रुपये देत आहे. त्याच प्रमाणे नगर रोडवरील विश्रामगृहाच्या सुरक्षेसाठी एका एजन्सीला जबाबदारी देण्यात आलेली असून त्या एजन्सीचे सहा सुरक्षारक्षक तीन शिफ्टमध्ये विश्रामगृहाची सुरक्षा करत असल्याचे बोलले जात आहे. प्रत्यक्षात कधीही विश्रामगृहात गेल्यानंतर त्याठिकाणी सुरक्षारक्षक उपस्थित नसतात. एखादा सुरक्षारक्षक उपस्थित असला तरी नियमाने प्रत्येक शिफ्टमध्ये दोन सुरक्षारक्षक असणे अपेक्षित आहे. परंतु या गंभीर प्रश्नाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग का दुर्लक्ष करत आहे? हे मात्र समजून येत नाही. विशेष म्हणजे विश्रामगृहाचे मॅनेजर यांच्यावर वाहनांसाठी गेट उघडण्याची वेळ येते. वारंवार त्यांनीही याप्रकरणी वरिष्ठांना कळविले आहे परंतु काही वरिष्ठ त्या सुरक्षा एजन्सीला मॅनेज असल्यानेच त्या सुरक्षा एजन्सीला अभय मिळत

### दररोज तीन शिफ्टसाठी सहा सुरक्षारक्षक फक्त कागदोपत्रीच, प्रत्यक्षात एकही सुरक्षारक्षक कर्तव्यावर उपस्थित नाही

### त्या एजन्सीला काही अधिकारी मॅनेज असल्याची शंका, त्या एजन्सीचे कंत्राट रद्द करण्याची गरज

### विश्रामगृहाच्या मॅनेजरवर वाहनांसाठी गेट उघडण्याची वेळ, कार्यकारी अभियंता तोंडे यांना वारंवार माहिती देवूनही त्या सुरक्षा एजन्सीला अभय



### ती सुरक्षा एजन्सी नियमात आहे का?

सुरक्षा एजन्सी सुरू करायची असेल तर सर्व नियमांचे पालन करून कागदोपत्री पूर्तता करून प्रशासनाची परवानगी घ्यावी लागते. जे सुरक्षारक्षक कर्तव्यावर असतील त्या सुरक्षारक्षकाचा विमा भरलेला आहे का? याशिवाय अनेक तांत्रिक बाबींची काळजी घेणे त्या एजन्सीचे काम आहे. एकंदरीत ती एजन्सी नियमात आहे का? याचाही दिव्य आधार पाठपुरावा करणार असून त्या एजन्सीला कोणत्या आधारावर सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरक्षारक्षक पुरवठा करण्याचे काम सोपविले आहे? तसेच किती सुरक्षा एजन्सीकडून सुरक्षारक्षक पुरवठा करण्यासाठी टेंडर मागविण्यात आले होते याचाही दिव्य आधार पाठपुरावा करणार आहे.

असावे अशी शंका व्यक्त केली जात आहे.

शासकीय विश्रामगृहात मोठमोठ्या मंत्र्यांपासून ते अधिकारी यांचा वावर आहे. हमखास मंत्री, अधिकारी मुक्कामी विश्रामगृहात थांबतात. त्यासाठी विशेष सुरक्षा म्हणून एका एजन्सीला विश्रामगृहाच्या सुरक्षेची ◀◀ पान २ वर

# जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी यांनी संगीन मस्जिद प्रॉपर्टीचे रजिस्ट्रेशन झालेले कागदपत्रे मागवून घेतली परंतु पडताळणी केलीच नाही

## जर १६ जुलैपर्यंत पडताळणी झाली नाही तर संगीन मस्जिद प्रकरण अधिकाऱ्यांच्या अंगलट येण्याची शक्यता

### मुख्य सचिव व औरंगाबाद वक्फ मंडळाचे सीईओ यांनी संगीन मस्जिद प्रॉपर्टी प्रकरणाकडे लक्ष देण्याची गरज

**बीड । दिव्य रिपोर्टर**

अंबाजोगाई येथील संगीन मस्जिद व संगीन मस्जिदची २७६ एक्कर इनाम खिदमतमाश असलेल्या जागेची गॅझेटमध्ये नोंद आहे. अशा इनामी मालमत्तेची नोंद उम्मीद पोर्टलवर करणे नियमाने बंधनकारक आहे. या प्रकरणी बीडचे जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी यांनी दिव्य आधारच्या प्रतिनिधीकडून संगीन मस्जिद जागेचे रजिस्ट्रेशन झालेले कागदपत्रे मागील आठवड्यात मागून घेतली परंतु अद्यापपर्यंत त्यांनी रजिस्ट्रेशन झालेल्या कागदपत्राची पडताळणी केली नसल्यामुळे अद्यापपर्यंत संगीन मस्जिदच्या प्रॉपर्टीची उम्मीद पोर्टलवर नोंद झाली नसून जर १६ जुलैपर्यंत ही नोंद झाली नाही तर संगीन मस्जिद प्रॉपर्टी प्रकरण जबाबदार अधिकाऱ्यांच्या अंगलट येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

ज्याअर्थी संगीन मस्जिदच्या १० सर्वे नंबरमधील २७६ एक्कर खिदमतमाश जागेचा गॅझेटमध्ये उल्लेख आहे. ज्या जागेचा गॅझेटमध्ये उल्लेख आहे अशा जागेची उम्मीद पोर्टलवर नोंद घेण्याची जबाबदारी जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी यांची आहे. परंतु बीडच्या वक्फबोर्ड कार्यालयात फक्त संगीन मस्जिदची नोंद करण्यात आली. तसेच संगीन मस्जिदच्या प्रॉपर्टीच्या दहा सर्वे नंबरपैकी फक्त तीन सर्वे नंबरची नोंद उम्मीद पोर्टलवर घेतल्याची माहिती स्वत: जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी ◀◀ पान २ वर

### मुख्य सचिव व सीईओ यांनी लक्ष देणे गरजेचे

ज्या खिदमतमाश इनामी जमिनीची गॅझेटमध्ये नोंद आहे व त्या जमिनी दुर्लक्षित झालेल्या आहेत किंवा ज्या जमिनीला कोणी वाली नाही अशा दुर्लक्षित जमिनी उम्मीद पोर्टलवर नोंद करण्याची जबाबदारी सर्व प्रथम वक्फबोर्ड कार्यालयाची आहे. तसेच काही समाजसेवकही अशा दुर्लक्षित जमिनी रजिस्ट्रेशन करून वक्फबोर्ड अधिकाऱ्यांना सहकार्य करू शकतात म्हणूनच अंबाजोगाई येथील संगीन मस्जिदच्या २७६ एक्कर जागेचे रजिस्ट्रेशन उम्मीद पोर्टलवर घेण्यासाठी एका समाजसेवकाने केले होते. रजिस्ट्रेशन केल्यानंतरही जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी यांनी झालेल्या रजिस्ट्रेशनची पडताळणी अद्यापपर्यंत का केली नाही? असा प्रश्न उपस्थित होत असून जोपर्यंत जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी रजिस्ट्रेशन झालेल्या कागदपत्रांची पडताळणी करणार नाही तोपर्यंत उम्मीद पोर्टलवर अशा जागेची नोंद होणार नाही. नियमाने १६ जुलैपर्यंत या नोंदी उम्मीद पोर्टलवर घेणे बंधनकारक आहे. जर संगीन मस्जिदच्या २७६ एक्कर जागा उम्मीद पोर्टलवर नोंद घेण्यास टाळाटाळ झाली तर भविष्यात सदरील प्रकरण जबाबदारांच्या अंगलट येण्याची शक्यता आहे. तत्पूर्वीच मुख्यसचिव व औरंगाबाद वक्फमंडळाचे सीईओ पठाण यांनी संगीन मस्जिद प्रॉपर्टी प्रकरणाकडे लक्ष देणे गरजेचे वाटते.

# चक्क वॉचमन झाले कनिष्ठ अभियंता, सीईओ रहेमान यांनी अशा अभियंतांच्या परीक्षा घेण्याची गरज

### बांधकाम पर्यवेक्षक परीक्षा पास झाल्याचे प्रमाणपत्र जोडून काही स्थापत्य अभियंता यांनी केली प्रशासनाची दिशाभुल

### गेवराई व केजमध्ये विशेष लक्ष देण्याची गरज माहितीच्या अधिकारातून माहिती मिळाल्यानंतर दिव्य आधार करणार मोठी पोलखोल

**बीड । दिव्य रिपोर्टर**

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर कर्तव्य बजावत असताना दहा वर्षानंतर मेटा/मेरी परीक्षा उत्तीर्ण करून कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती किंवा अश्वासित प्रगती योजनेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना घेता येतो. परंतु कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती ◀◀ पान २ वर

### सीईओ यांनी यांच्या परीक्षा घेण्याची गरज

वॉचमन म्हणून नोकरीला लागले व त्यांनी कार्यालयाची पूर्व परवानगी घेतली नाही आणि महाराष्ट्र राज्य शिक्षण परीक्षा मंडळ परीक्षा पास प्रमाणपत्र कार्यालयास सादर केले. या प्रमाणपत्राआधारे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर समायोजन केले, या पदासाठी आवश्यक त्यांना कोणतेच ज्ञान नाही, कोणतेच अंदाजपत्रक त्यांना कळत नाही, त्यांना सेंटीमिटर, इंच, फुट, सक्वेअर फुट, स्क्वेअर मिटर, सिमेंट काँक्रीटचे प्रकार यांचे कसलेच ज्ञान त्यांना नाही, अंदाजपत्रकसुद्धा वाचता येत नाही. मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेता येत नाहीत, सर्व कामे दुसऱ्या लोकांकडून करून घेतात, एवढेच नव्हे तर सही कुठे करायची हे पण त्यांना सांगावे लागते. अशा वॉचमन पदावर नोकरीस लागल्यानंतर अज्ञानी कर्मचाऱ्यास व्यवसाय परीक्षेतून सुट देण्यासाठी शासनाचे परिपत्रक १ मार्च २०१८ मधील सूचनेनुसार वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर किंवा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर १५ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर व्यवसाय परीक्षा सुट देणेबाबत परिपत्रक आहे. असे असताना परिपत्रक निघाले नंतर म्हणजेच १ मार्च २०१८ नंतर ५ मार्च २०२० दिनांकास शासन परिपत्रकातील सूचना डावलून नियमबाह्य पद्धतीने जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यामुळे व्यवसाय परीक्षेत सुट आदेश दिले आणि कनिष्ठ अभियंता पदासाठी ज्येष्ठता यादीत नाव घेवून संबंधितास चुकीच्या पद्धतीने २०२२ यासाली कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती दिली आहे. अशाप्रकारे जिल्हा परिषद बीड बांधकाम विभागात शासनाची दिशाभुल करून नियमबाह्य पद्धतीने शासन परिपत्रकातील निकष डावलून अनेक स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिल्याची शंका असून सीईओ जितिन रहेमान यांनी अशा पदावर असलेल्या अभियंतांची परीक्षा घेण्याची गरज आहे.

# कृषि विभागातील बोगस कामांची कार्यकारी अभियंता यांनी नियमाने चेकींग करून बिले दिली असती तर बोगस कामाला लगाम लागला असता

## कॅबिनमध्ये बसून बिले मंजूर करण्याचे हे परिणाम म्हणावे लागेल

**बीड । दिव्य रिपोर्टर**

धानोरा रोड परिसरातील कृषि विभागात असलेल्या बिंदुसरा व तालुका बीजगुणन केंद्र त्याशिवाय शिदोड व नवगण राजुरी येथील तालुका बीजगुणन केंद्र याठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत अडीच कोटीपेक्षा जास्तीची कामे करण्यात आलेली आहेत. यात सिमेंट रस्ते, लोखंडी शेड, गोदाम, बोअर व पंपहाऊस, मुख्य प्रवेशद्वार व पाईप लाईन अशा विविध कामांचा यात समावेश आहे. काही दिवसांपूर्वी दिव्य आधारच्या प्रतिनिधीने बीड कृषि विभाग व शिदोड बीजगुणन केंद्रात तयार झालेल्या सिमेंट रस्त्यांची अवस्था

### कृषि विभागात यापूर्वी सिमेंट रस्ते कधी झाले होते का? संरक्षण भिंत यापूर्वी कधी बांधण्यात आली होती का? उत्तर विभागातून कृषि विभागात काही योजना राबविण्यात आलेल्या आहेत का? दिव्य आधार घेणार सर्व आढावा

कशी झाली? त्याशिवाय इतर कामावरही प्रश्न उपस्थित केले होते. विशेष म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तोंडे यांना आव्हानात्मक बातमी करून तोंडे यांनी हातात अंदाजपत्रक व इस्टिमेटची प्रत घेवून या कामाची पाहणी करावी असे मत व्यक्त केले होते परंतु अद्यापपर्यंत या कामाची कोणतीच चौकशी झाली नाही. आज नाही तर उद्या बोगसगिरी करणाऱ्यांना चौकशी समितीच्या सामोरे जावेच लागणार यात काही शंका नाही. जोपर्यंत या कामांची पारदर्शक चौकशी होत नाही व बोगसगिरी करणाऱ्यांकडून रिकव्हरी होत नाही तोपर्यंत दिव्य आधार याचा पाठपुरावा करणार हे मात्र सत्य

### बनावट कागदपत्रांचा आधार, पूर्ण २५ कामे तपासून पहा

मिळालेल्या माहितीनुसार सदरील कामाचे मागणीपत्र मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी बनावट कागदपत्रांचा आधार घेतल्याची शंका असून कामाच्या संचिका तपासल्या तर सर्व बाबी समजून येतील. याशिवाय बीड कृषि विभाग शिदोड बीजगुणन केंद्र व नवगण राजुरी बीजगुणन केंद्र या तीन ठिकाणी मिळून एकूण २५ कामे झालेली आहेत. कार्यकारी अभियंता तोंडे यांनी या सर्व २५ कामांची स्वत: पाहणी करावी, जे काम बोगस असतील तो भाग वेगळा परंतु सर्व २५ कामे झालीत का? यातही शंका असून जोपर्यंत पारदर्शक चौकशी होत नाही तोपर्यंत संशय राहणारच.

आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत झालेल्या कामांची बिले देण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांनी स्वत: काम झालेल्या ठिकाणी जावून कामांची पाहणी करावी, काम दर्जेदार झाले का? कामात काही त्रुटी आहे का? अशाप्रकारे सर्व महत्त्वाचे मुद्दे तपासून शेवटी त्या एजन्सीचे बिल मंजूर करणे अशाप्रकारे ही कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी असते. जर कृषि विभागात झालेल्या कामांची कार्यकारी अभियंता यांनी स्वत: पाहणी केली असती तर त्याचवेळी बोगसगिरीला लगाम लागली असती परंतु कॅबिनमध्ये बसून बिले मंजूर करण्याचा हा परिणाम म्हणावा लागेल. आजही कार्यकारी अभियंता आणि कृषि विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बिंदुसरा, तालुका बीजगुणन केंद्र व शिदोड येथील बीजगुणन केंद्रात जावून सिमेंट रस्त्याची पाहणी करावी. नवीन तयार झालेल्या रस्त्याला अक्षरश: भेगा पडल्यात तर काही ठिकाणी सिमेंट रस्त्याचा चुराडा झाला. लाखो रुपये खर्चून तयार केलेले नवे रस्ते एवढ्या लवकर कसे ◀◀ पान २ वर

### कृषि विभागात यापूर्वी झालेल्या कामांचा आढावा घेणे गरजेचे

सार्वजनिक बांधकाम विभागातून झालेल्या या कामांचा आढावा दिव्य आधार मागील दोन महिन्यांपासून घेत आहे. या २५ कामात सिमेंट रस्ते, संरक्षण भिंत, लोखंडी शेड, गोदाम याशिवाय अनेक कामे झालेली आहेत. या मंजूर होवून पूर्ण झालेल्या २५ कामांपूर्वी कृषि विभागात सिमेंट रस्ते तयार करण्यासाठी निधी देण्यात आला होता का? यापूर्वी संरक्षण भिंतसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता का? या २५ कामांपैकी यापूर्वी काही कामांना निधी देण्यात आला होता का? जर निधी देण्यात आला होता तर कोणत्या वर्षी हे रस्ते यापूर्वी झालेले आहेत? कोणत्या वर्षी संरक्षण भिंत यापूर्वी बांधण्यात आलेली आहे? अशा सर्व कामांचा दिव्य आधार पाठपुरावा करणार आहे.

पान १ वरून

## कृषि विभागातील बोगस

खचले म्हणजे हे बोगस कामाचे उदाहरणच आहे. त्याशिवाय साडेनऊ लाख रुपयांपेक्षा जास्तीचा निधी बोअर खोदून, मोटार बसवून, पंपहाऊस तयार करण्यासाठी देण्यात आला. ४०० फुट बोअर खोदण्यासाठी ४० ते ५० हजार रुपये खर्च येतो. मोठी मोटार बसविली तरी त्याला ५० हजार रुपये लागतील, एकंदरीत एक लाख रुपयांमध्ये बोअर खोदून मोटार बसविता येते. त्याशिवाय पंपहाऊस तयार करण्यासाठी तीन लाख रुपये खर्च धरुयात म्हणजे एकूण ४ लाख रुपयांत हे काम झाले असते. परंतु अंदाजपत्रक साडेनऊ लाख रुपयांचे तयार करण्यात आले. म्हणजे अंदाजपत्रकातच घोळ करण्यात आला असावा असा अंदाजा व्यक्त केला जात आहे. त्याशिवाय लोखंडी शेडही तयार केलेले दिसून आले. त्या शेडला बारकाईने पाहिले तर शेडच्या खालच्या बाजूला पत्रे सडलेले दिसून आले. जर हाच लोखंडी शेड तयार केला असेल तर त्यात जुन्या पत्र्याचा वापर झाल्याचे स्पष्ट होते. या सर्व कामांची कार्यकारी अभियंता व कृषि विभागातील जबाबदारांनी पाहणी करणे गरजेचे आहे. चौकशीत ही कामे दर्जेदार आढळून आली तर आम्ही त्या एजन्सीचा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन करू यात काही शंका नाही.

## सुरक्षा एजन्सीवर लाखोंचा

जबाबदारी देण्यात आलेली आहे. त्या खासगी सुरक्षा एजन्सीचे सहा सुरक्षा रक्षक प्रत्येक शिफ्टमध्ये दोन प्रमाणे २४ तास विश्रामगृहाची सुरक्षा करतात. परंतु हे सुरक्षारक्षक कधीच विश्रामगृहात किंवा विश्रामगृहाच्या गेटजवळ थांबलेले दिसत नाहीत. ज्या एजन्सीला सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत दर महिन्याला सहा सुरक्षारक्षकाचा लाखो रुपये पगार त्या एजन्सीला दिला जातो. तर मग सुरक्षारक्षक का उपस्थित नसतात? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून विश्रामगृहाचे मॅनेजर यांना अनेकवेळा विश्रामगृहाचे गेट वाहनांसाठी उघडणे आणि बंद करण्याची वेळ येते. दुसरे महत्त्वाचे असे की, ज्या एजन्सीला विश्रामगृहाच्या सुरक्षेची जबाबदारी सोपविण्यात आली ती एजन्सी जर सुरक्षारक्षक पुरवठा करत नसतील तर त्या एजन्सीचे कंत्राट रद्द करणे हे सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांचे कर्तव्य आहे परंतु कार्यकारी अभियंता तोंडे अशा बेजबाबदार एजन्सीला अभय देताना दिसून आले. यापूर्वीही विश्रामगृहात सुरक्षारक्षक उपस्थित नसल्याची माहिती कार्यकारी अभियंता तोंडे व उपअभियंता चिरके यांना देण्यात आली होती परंतु संबंधितांनी त्या एजन्सीला माहिती दिल्यानंतर त्या एजन्सीने तात्काळ एक सुरक्षारक्षक विश्रामगृहात पाठवून दिला होता. पुन्हा रविवारी सुरक्षारक्षक उपस्थित नसल्याचे दिसून आले. सुरक्षारक्षकाच्या जागेवर त्या एजन्सीचे एक सुपरवायझर खुर्चीवर बसून होते. त्यांना या प्रकरणी विचारणा केली, त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार मी सुरक्षारक्षक आहे की नाही हेच पहायला आलो होतो. एकंदरीत शासकीय विश्रामगृहाची सुरक्षा सध्या तरी वाऱ्यावर असून या गंभीर प्रश्नाकडे अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

## चक्क वॉचमन झाले कनिष्ठ

मिळविण्यासाठी तथा अश्वासित योजनेचा लाभ घेण्यासाठी काही स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी मोठी बोगसगिरी केल्याची बाब दिव्य आधारने ग्राऊंड रिपोर्टींगच्या माध्यमातून उघडकीस आणली होती. सदरील ग्राऊंड रिपोर्टींग प्रकाशित झाल्यानंतर यातील अनेक गंभीर बाबी पुन्हा उघडकीस येत असून चक्क वॉचमन पदावर असताना स्थापत्य सहाय्यक अभियांत्रिकी पदावर विराजमान होवून काही वॉचमन कनिष्ठ अभियंता झाल्याची बाब समजली असून गेवराई व केज येथील कनिष्ठ अभियंता झालेल्या अभियंतांवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर दहा वर्षे झाल्यानंतर त्यांना मेटा/मेरी परीक्षा उत्तीर्ण होवून कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती मिळविता येते किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेता येतो. परंतु काही स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी मेटा/मेरी परीक्षा न देता बांधकाम पर्यवेक्षक डिप्लोमा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र जोडून प्रशासनाची दिशाभुल करून कनिष्ठ अभियांत्रिकी पदावर पदोन्नती मिळविली किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतला. सदरील बाब अत्यंत गंभीर असून काही वॉचमन पदावर नोकरीला लागलेल्या कर्मचाऱ्यांनी चक्क कनिष्ठ अभियंता पदापर्यंत मजल मारली. कदाचित त्यांनी सर्व नियमांचे पालन करून पदोन्नती मिळविली असेल. परंतु वॉचमन पदावर असताना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक होण्यासाठी परीक्षा पास कसे झाले? नियमाने ते तर वॉचमन पदावर नोकरीला होते. तसेच काही स्थापत्य अभियंता यांनी चुकीचे कागदपत्र जोडून शासनाची दिशाभुल करत पदोन्नती मिळविली

किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतला. आता या प्रकरणाला दिव्य आधारने वाचा फोडली असून लवकरच माहितीच्या अधिकारातून बोगस पद्धतीने पदोन्नती मिळविलेल्या किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेल्याची दिव्य आधार पोलखोल करणार यात काही शंका नाही.

## लाभार्थीच्या बोगसगिरीत एका मोठ्या अधिकाऱ्याचा समावेश

नियमाने स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक झाल्यानंतर दहा वर्षे कर्तव्य बजावल्यानंतर नियमाने मेटा/मेरी परीक्षा देवून कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती घेणे किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेणे ही बाब नियमात आहे परंतु काही स्थापत्य अभियंता यांनी नियमबाह्य पद्धतीने कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती घेवून पुन्हा नियमबाह्य पद्धतीने मोठ्या पदावर विराजमान झाल्याची माहिती मिळाली असून लाभार्थीच्या बोगसगिरीत एका मोठ्या अधिकाऱ्याचा समावेश असल्याची बाब समजली असून लवकरच त्या अधिकाऱ्याची पोलखोल करणार आहोत.

## जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी

यांनी दिव्य आधारच्या प्रतिनिधीला दिली होती. उर्वरित ७ सर्वे नंबरमधील २०० एक्करपेक्षा जास्त जमिनीची नोंद कधी घेणार अशी विचारणा केल्यानंतर जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी यांनी एका समाजसेवकाने रजिस्ट्रेशन केलेल्या कागदपत्राची मागणी करून घेतली परंतु अद्यापपर्यंत उम्मीद पोर्टलवर उर्वरित ७ सर्वे नंबरची नोंद झाली नसल्याचे दिसून येत असून १६ जुलैपर्यंत जर गॅझेटमधील संगीन मस्जिदच्या जागेची नोंद उम्मीद पोर्टलवर झाली नाही तर जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी यांना याचा जवाब द्यावा लागेल, त्याशिवाय सदरील प्रकरण जबाबदार अधिकाऱ्याच्या अंगलट येण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

# आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

**बीड । दिव्य रिपोर्टर**

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या संपूर्णता अभियान २.० चा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात सविस्तर आढावा घेतला. वडवणी तालुक्याचा विकास आराखडा गतिमान करतानाच, यामध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी यंत्रणेला दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर काळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकिसन इघारे यांच्यासह विविध संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी वडवणी तालुक्यातील आरोग्य, शिक्षण, जन्म-मृत्यू दर आणि शेतीविषयक प्रयोगांची सखोल माहिती घेतली. तालुक्यात जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे



होणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून झालेले नदी खोलीकरणाचे काम कौतुकास्पद असून, त्यांना सोबत घेऊन काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, तालुक्यातील नाला खोलीकरण आणि शेततळे खोलीकरणाच्या कामांना अधिक गती देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी स्वतः विशेष प्रयत्न करावेत, असे आदेश त्यांनी दिले.

कृषी विभागाचा आढावा घेताना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी पोकरा योजनेतील त्रुटींवर बोट ठेवले. वडवणी तालुक्यात पोकरा अंतर्गत रेशीम शेतीचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. आगामी काळात रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेशही त्यांनी दिले. यासोबतच, शासनाच्या धोरणानुसार मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला सौर पंप उपलब्ध करून देण्याची सूचना त्यांनी कृषी व महावितरणच्या अधिकाऱ्यांना केली. ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी आरसेटी प्रशिक्षणे, मुद्रा बँक कर्ज योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, आणि प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या आर्थिक योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देशही देण्यात आले. याशिवाय, ग्रामीण भागातील प्रलंबित घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करणे आणि आरोग्य उपकेंद्रांच्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत त्यांनी संबंधित यंत्रणेला सूचना दिल्या.

# मुक्ताई पालखीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी शिवसेनेतर्फे मोफत आरोग्य व औषधोपचार शिबिर!

**बीड । दिव्य रिपोर्टर**

संतश्रेष्ठ मुक्ताई पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवाभावातून शिवसेनेच्या वतीने रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० ते ३ वाजे पर्यंत मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे घेण्यात आले आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाप्रमुख संतोष जाधव यांच्या पुढाकाराने हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले आहे. विशेष म्हणजे, गेल्या १५ वर्षांपासून संतोष जाधव व त्यांच्या संपूर्ण परिवाराच्या वतीने मुक्ताई पालखीतील वारकऱ्यांची निस्वार्थ भावनेने सेवा केली जात असून, ही सेवेची परंपरा यंदाही





कायम ठेवण्यात आली आहे. शिबिरामध्ये वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक औषधोपचार तसेच तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात अली आहे.

वारकरी सेवेलाच ईश्वरसेवा मानत राबविण्यात येणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरले असून, शेकडो वारकऱ्यांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला यावेळी जिल्हा रुग्णालय येथील डॉ.नालपे, डॉ. श्यामसुंदर जोशी, डॉ. रमेश गुंजाळ, डॉ.स्नेहल गोसावी, डॉ.पदमश्री जोशी,आंधळे मॅडम,घरत मॅडम यांनी आरोग्य तपासणी केली.

व वारकऱ्यांचो सेवा केली या सर्व टीम चे शिवसेनच्या वतीने स्वागत केले ,, या वेळी उपस्तित प्रा लाक्षिमीकांत बाहेंगव्हाण कर सर , शिवसेना तालुका प्रमुख संतोष जाधव बोरफडीचे सरपंच सुनील कुठे ,नितीन दोडके ,राहुल कागदे ,विनोद चव्हाण , पंकज शेळके , बाळू धोत्रे लव्ह धोत्रे सार्थक जाधव व सर्व मित्र परिवार शिवसेना पदाधीकारी उपस्तित होते.

# सहा पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

**बीड । दिव्य रिपोर्टर**

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी सहा पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश काढले आहेत. प्रशासकीय तसेच कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीकोनातून बदलीने रिक्तपदे भरण्याच्या प्रक्रियेनुसार हे आदेश काढण्यात आले आहेत.

केज पोलीस ठाण्याचे पो. नि.स्वप्नील उनवणे यांची बीड येथील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी म्हणून बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी माजलगाव शहरचे पो.नि. राहुल सुर्यतळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर सध्या बीड येथील पोलीस नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पो.नि. प्रविणकुमार बांगर यांची माजलगाव शहर पोलीस ठाणे प्रभारी म्हणून पदस्थापना करण्यात आली आहे. बीड येथील सायबर पोलीस ठाण्याचे पो.नि.निलेश केळे यांची पेठ बीड पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी बदली करण्यात आली आहे तर पोलीस उपअधिक्षक मुख्यालय येथील पो.नि. अशोक मुदीराज यांच्यावर बीडच्या सायबर पोलीस ठाण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बीड येथील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी संतोष शेजाळ यांची पोलीस उपअधिक्षक मुख्यालय प्रभारी पदी बदली करण्यात आली आहे. संबंधित सर्व सहा पोलीस निरीक्षकांना बदलीच्या ठिकाणी तात्काळ रुजू होण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

# पंढरपूर जाणाऱ्या पायी दिंडी सोहळ्यात भाविक भक्तांनी सहभागी व्हावे -एकनाथ महाराज लोमटे

**गेवराई । दिव्य रिपोर्टर**

जनसेवा सद्गुरु सुभाष बाप्पा महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व एकनाथ महाराज लोमटे यांच्या मार्गदर्शनाने मलकापूर ते पंढरपूर पायी दिंडीचे आयोजन केले असून या दिंडी सोहळ्यास बहुसंख्येने भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे वाहन मलकापूर संस्थांचे मठाधिपती एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.



प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी जनसेवानंद सुभाष बाप्पा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व एकनाथ महाराज लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८ जुलै रोजी मलकापूर ते पंढरपूर वारीचे प्रस्थान होणार असून. या पायी दिंडी सोहळ्यात भाविक भक्तांनी पायीदिंडी सोहळा सहभागी व्हावी असे आवाहन एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.या दिंडी सोहळ्यात जाणाऱ्या भक्तांसाठी नाष्ट्याची व्यवस्था महादेव शिंदे, नामदेव लोमटे, रामहरी लोमटे ,अरविंद जगदाळे ,गणेश लोमटे ,सौ रंजना अंधारे, नवनाथ वाघज,सनि शिंदे ,सुरज मोरे ,शहाजी चव्हाण ,शिवाजी पाटील, समस्त ग्रामस्थ उपळाई उषा शिंदे व भारत वागज यांनी केले आहे, तर जेवणाची व्यवस्था सुरेश मुळे, रामलिंग मुंडे, संजय पाटील, सोमनाथ मोटे,अर्जुन काकडे ,गणेश ढोरे, मच्छिंद्रनाथ नलावडे ,दत्तात्रय नलावडे, हनुमंत मिलगे ,विनोद मोरे, धनंजय मद्रेवार, दिगंबर देवकर, शिवाजी बर्गे,चंद्रकांत घावटे, चंद्रकांत बारगुळे,संजय शिंदे सोमनाथ फरड ,नामदेव वाघमारे, विलास वाघज ,विश्वनाथ चव्हाण, समाधान आनवते , तर महाप्रसाद संजय वाकडे यांचा होणार आहे हे पायी दिंडी सोहळ्यातील अन्न दाते आहेत हा पायी दिंडी सोहळा दिनांक १८ जुलै शनिवार रोजी मलकापूर येथून या दिंडीचे प्रस्थान होणार आहे तरी भाविक भक्तांनी या पायी दिंडी सोहळ्याचा सहभागी व्हावी असे आवाहन मलकापूर संस्थांचे मठाधिपती एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

# घाटनांदूरमध्ये भररस्त्यात तीक्ष्ण हत्याराने वार करुन तरुणाला संपवले

**आंबेजोगाई । दिव्य रिपोर्टर**

तालुक्यातील घाटनांदूर येथील अण्णाभाऊ साठे चौकात शनिवारी रात्री एका तेवीस वर्षीय तरुणाची तीक्ष्ण हत्यारे आणि दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची भयानक घटना उघडकीस आली आहे. ज्ञानेश्वर वाकडे (वय २३, रा. पट्टीवडगाव) असे या मृत तरुणाचे नाव असून या जीवघेण्या हल्ल्यात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. भररस्त्यात घडलेल्या या रक्तरंजित घटनेमुळे परिसरात मोठी दहशत पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.




सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ज्ञानेश्वर वाकडे हा शनिवारी रात्री आपल्या एका मित्रासोबत दुचाकीवरून घाटनांदूर येथून पट्टीवडगाव या आपल्या गावाकडे जाण्यासाठी निघाला होता. हे दोघे अण्णाभाऊ साठे चौकात आले असता काही जणांनी त्यांची दुचाकी अचानक अडवली. काही समजण्याच्या आतच हल्लेखोरांनी ज्ञानेश्वर आणि त्याच्या मित्रावर तीक्ष्ण हत्यारे, दगड आणि विटांनी अमानुष हल्ला चढवला. या भयंकर मारहाणीत रक्ताच्या थारोळ्यात पडून ज्ञानेश्वरचा मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेला मित्र या हल्लयात गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. हा जीवघेणा हल्ला कोणत्या कारणास्तव झाला हे अद्याप समजू शकलेले नाही. कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणाऱ्या या घटनेने सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या भीषण घटनेनंतर मयत ज्ञानेश्वरचे संतप्त आणि दुःखी नातेवाईक तक्रार देण्यासाठी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात बसून आहेत. अद्याप या प्रकरणी अधिकृतपणे गुन्हा दाखल झालेला नसून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस पुढील तपास करत आहेत. पोलीस तपासानंतरच अधिकृत माहिती समजू शकणार आहे.

# 'आमदार श्री शाळा' उपक्रमाची घोषणा; आष्टी-पाटोदा-शिरूरमधील शाळा रोल मॉडेल बनविणार - आ.धस

**आष्टी । दिव्य रिपोर्टर**

जिल्हा परिषद बीडचा शिक्षण विभाग आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मिशन निपुण बीड' संकल्प कार्यशाळेत शिक्षणाची गुणवत्ता, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान तसेच सरकारी शाळांना जागतिक दर्जाच्या बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यशाळेत राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि आमदार सुरेश धस यांनी शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी 'आमदार श्री शाळा' या अभिनव उपक्रमाची घोषणा केली. पहिल्या टप्प्यात मतदारसंघातील उत्कृष्ट कार्य करणारे शिक्षक, ग्रामस्थ व सरपंच असलेल्या शाळा दत्तक घेऊन त्यांचा रोल मॉडेल म्हणून विकास केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.




या उपक्रमासाठी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके आणि संदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली समिती स्थापन करून शाळांच्या विकासाचा रोडमॅप तयार केला जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा विकसित करण्यात येतील. कोणत्याही पालकाला आपल्या पाल्याला खासगी शाळेत पाठविण्याची गरज भासू नये, यासाठी आवश्यक त्या सुविधा व अतिरिक्त शिक्षकांची पदे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान म्हणाले, या कार्यशाळेचा उद्देश शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे हा आहे. आमदार सुरेश धस यांचे दर्जेदार शिक्षणावर विशेष लक्ष असून, आता जिल्हा, तालुका आणि केंद्र स्तरावर नियमित कार्यशाळा घेऊन विद्यार्थी केंद्रित शिक्षणावर भर दिला जाईल. शिक्षकांनी प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना घडवावे, प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे म्हणाले, सरकारी शाळांमधून विद्यार्थ्यांचे खासगी शाळांकडे होणारे स्थलांतर थांबून उलट 'रिव्हर्स मायग्रेशन' घडले पाहिजे. पालकांना इंग्रजी बोलणारी, गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणारी मुले हवी आहेत. त्यामुळे शिक्षकांनी शिक्षणाची गुणवत्ता वाढवून शंभर टक्के विद्यार्थी साक्षर करण्याचा संकल्प करावा. विद्यार्थी समजून घेणे, 'विषय मित्र' संकल्पना प्रभावीपणे राबविणे, विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना आणि निरोगी स्पर्धा निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी, सरकारी शाळाही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या होऊ शकतात. असे कार्य करा की समाज तुम्हाला कायम लक्षात ठेवेल. आपल्या गावाला जगाच्या नकाशावर नेण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे आपली शाळा, असे प्रतिपादन केले. वाबळेवाडी शाळेच्या संघर्षमय काळाची आठवण करून देताना त्यांनी आमदार सुरेश धस यांनी दिलेल्या सहकार्याचा उल्लेख केला. आष्टी-पाटोदा-शिरूरमधील शिक्षक भाग्यवान आहेत. त्यांच्या पाठीशी सह्याद्रीसारखा नेता उभा आहे, असे गौरवोद्गार काढत प्रत्येक शिक्षकाने मी माझी शाळा जागतिक दर्जाची घडवीन असा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# जय हिंद कॅम्पस, मिल्लतनगर येथे विशेष मतदार यादी पुनरीक्षण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; रविवारी देखील नागरिकांना घेतला लाभ

**बीड । दिव्य रिपोर्टर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण ( एस . आय . आर . ) कार्यक्रमांतर्गत बीड शहरातील जय हिंद कॅम्पस , मिल्लत नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय विशेष शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे . मतदार यादी अधिक अचूक , अद्ययावत व सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरामुळे संबंधित प्रभागातील हजारो मतदारांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे .





एस . आय . आर . अभियानांतर्गत यापूर्वी मतदारांच्या प्राथमिक माहितीचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले असून त्यानंतर प्रत्येक पात्र मतदाराकडून गणना प्रपत्र ( एन्युमरेशन फॉर्म ) भरून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे . या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १९ , २० , २१ व २२ मधील मतदारांसाठी जय हिंद कॅम्पस येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . आमदार विजयसिंह पंडित यांनी शिबिराची पाहणी करून संबंधित लोकांना मार्गदर्शन केले संबंधित प्रभागांतील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी ( बी . एल . ओ . ) प्रत्यक्ष शिबिरस्थळी उपलब्ध असल्याने नागरिकांना कोणतीही गैरसोय न होता आवश्यक माहिती , कागदपत्रांची पडताळणी व प्रपत्र भरण्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण होत आहे.शिबिराला भेट देऊन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके तसेच मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी कामकाजाची पाहणी केली . त्यांनी नागरिकांशी संवाद साधत आवश्यक मार्गदर्शन केले तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून कोणताही मतदार वंचित राहणार नाही , याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या .

यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की , विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण हा लोकशाही बळकट करण्याचा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे . प्रत्येक पात्र मतदाराने आपले गणना प्रपत्र वेळेत भरून आवश्यक कागदपत्रांसह मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे जमा करावे , जेणेकरून मतदार यादी अचूक व त्रुटीमुक्त तयार होईल .

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बीड तालुक्यात विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत असून प्रत्येक मतदान केंद्रावर तसेच विशेष शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत . नागरिकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता तातडीने आपली प्रक्रिया पूर्ण करावी , असेही त्यांनी आवाहन केले .

शिबिराच्या आयोजनासाठी जय हिंद एज्युकेशन कॅम्पसचे सचिव तथा सभापती शेख निजाम जैनुद्दीन यांनी विशेष पुढाकार घेतला . यावेळी नगरसेवक खय्युम इनामदार , नगरसेवक रईसभाई , नगरसेवक इलियासभाई , मुन्नाभाई इनामदार तसेच परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते . उपस्थित लोकप्रतिनिधींनी नागरिकांना प्रपत्र भरण्यासाठी प्रोत्साहित करत प्रशासनाच्या उपक्रमाचे स्वागत केले. रविवार रोजीही हे विशेष शिबिर जय हिंद कॅम्पस येथे सुरू राहणार असून प्रभाग क्रमांक १९ , २० , २१ व २२ मधील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तेथे उपस्थित राहणार आहेत . त्यामुळे संबंधित प्रभागांतील सर्व पात्र मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरास उपस्थित राहून आपले गणना प्रपत्र भरून द्यावे व विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा , असे आवाहन जय हिंद एज्युकेशन कॅम्पसचे सचिव तथा सभापती शेख निजाम जैनुद्दीन यांनी केले आहे .

### आमदार विजयसिह पंडित यांची सदिच्छा भेट

**मोहिमेस आमदार, विजयसिंह पंडित यांनी सदिच्छा भेट देऊन आढावा घेतला तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, नगरसेवक दिनेश मुंदडा, नगरसेवक सय्यद इलियास, नगरसेवक वाजेद कुरेशी, नगरसेवक मनोज गोडसे,नगरसेवक, खय्युम इनामदार, नगरसेवक शेख रईस, माजी नगरसेवक मुन्ना इनामदार सर्वेक्षक बीएलओ सहित सर्व नागरिक उपस्थित होते मोहिमेत सर्वांनी सामील व्हावे व आपली आपली नावांची नोंद करावी!**

# तुकाराम मुंढे यांच्या रडारवर आता शाळेचे उपहारगृह!

## मध्यान्ह भोजनावर असणार करडी नजर

**मुंबई । दिव्य रिपोर्टर**

तुकाराम मुंढेंनी आपला मोर्चा शाळांच्या उपहारगृहांकडे आणि महापालिकांच्या शाळांमध्ये मिळणाऱ्या भोजनांकडे वळवला आहे. या संदर्भातील मुख्याध्यापक, बचत गट, शिक्षणाधिकाऱ्यांसोबतची एफडीएची बैठक सुद्धा झाली आहे.

अन्न आणि औषध प्रशासनाचा कारभार आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे आल्यापासून हॉटेल मालकांचे आणि भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मुंढेंच्या नेतृत्वात एफडीएने अनेक मिठाई तयार करणाऱ्या दुकानांवर, हॉटेल्सवर, दूध उत्पादकांवर धाड टाकल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण पावसाळी अधिवेशनात राज्यातील अनेक



आमदारांनी मुढेंची या खात्यातून आता कोणत्याही ठिकाणी बदली करू नये, अशी मागणी केली आहे. अशातच आता तुकाराम मुंढेंनी आपला मोर्चा शाळांच्या उपहारगृहांकडे आणि महापालिकांच्या शाळांमध्ये मिळणाऱ्या भोजनांकडे वळवला आहे. या संदर्भातील मुख्याध्यापक, बचत गट, शिक्षणाधिकाऱ्यांसोबतची एफडीएची बैठक सुद्धा झाली आहे. महापालिकांच्या शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या जेवणामध्ये याआधी अनेकदा अळ्या किंवा अन्य शरीराला घातक अशा गोष्टी आढळून आल्या होत्या. ज्यामुळे मोठे वाद निर्माण झाले होते. त्यामुळे आता मध्यान्ह भोजन व शाळांमधील उपाहारगृहांच्या तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासन सरसावले आहे. आता मुंबईतील खासगी शाळांमधील उपाहारगृहे तसेच मध्यान्ह भोजन पुरविणारे किचन शेड यांच्यावर एफडीएची करडी नजर असणार आहे. यासंदर्भात मुंबईत विविध ठिकाणी शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक आणि बचत गट चालकांसोबत शुक्रवारी (१० जुलै) एक महत्त्वाची बैठक पार पडली. ज्यानंतर आता अन्न व औषध प्रशासनाने अन्न सुरक्षा मानके अधिनियम २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गतिमान कार्यवाही सुरू केली आहे.

# ऊस शेतात गांजाची लागवड

## चकलांबा पोलिसांकडून ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड जिल्हा पोलीस दलाने अवैध धंद्यांविरोधात राबवलेल्या विशेष मोहिमेत मोठी कारवाई केली आहे. चकलांबा पोलीस स्टेशनच्या पथकाने सुरळेगाव शिवारातील ऊसाच्या शेतात केलेली गांजाची लागवड उद्ध्वस्त केली असून, तब्बल ४८ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे चकलांबा पोलिसांनी सुरळेगाव शिवारातील गट क्रमांक ११३ मधील ऊसाच्या शेतावर छापा टाकला. या कारवाईत गांजाची लहान-मोठी २५३ झाडे जप्त करण्यात आली. या झाडांचे वजन १८४.४ किलो असून त्यांची अंदाजे किंमत ४६ लाख १० हजार रुपये आहे. याशिवाय ४ किलो ३०० ग्रॅम सुका गांजा (किंमत २ लाख ६ हजार ४०० रुपये) आणि ४५० ग्रॅम निमसुका गांजा (किंमत ११ हजार २५० रुपये) असा एकूण ४८ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणी मनोज ऊर्फ बादल भगवान आंधळे (वय ३६, रा. नगद नारायण वस्ती, सुरळेगाव, ता. गेवराई) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल

करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश कन्हाडकर, सहाय्यक फौजदार सोमनाथ कुलकर्णी, पोलीस हवालदार विश्वनाथ प्रधान, नरेन्द्र बांगर, पोलीस अंमलदार हनुमान इंगोले, संदीप गायकवाड व प्रशांत घोंगडे यांच्या पथकाने केली.

### नागरिकांना आवाहन

अमली पदार्थांची लागवड, साठवणूक, विक्री किंवा वाहतूक याबाबत काही माहिती असल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या ९२७०२४३२०० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बीड पोलिसांनी केले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.

# ‘पसायदानाद्वारे ’जो जे वांछिल तो ते लाहो’ म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित शाळा कधी ? ; महाजनवाडी जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक

**लिंबागणेश । दिव्य रिपोर्टर**

जिल्हा परिषद शाळांमध्ये दररोज 'पसायदान' म्हणत विश्वकल्याणाची प्रार्थना करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित व सुसज्ज शैक्षणिक वातावरण मिळेल का, असा प्रश्न महाजनवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या दुरवस्थेमुळे निर्माण झाला आहे. बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत १९५४ पूर्वी बांधण्यात आली असून ती सध्या अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत आहे. या शाळेत शिक्षण घेणारे सुमारे १२५ विद्यार्थी व शिक्षकांचा जीव धोक्यात असल्याने नवीन वर्गखोल्या बांधण्यासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून तातडीने तरतूद करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



### लोकसहभागातून सुविधा उभारल्या; आता नवीन वर्गखोल्यांसाठी शासनाने निधी द्यावा – सरपंच गिरी

ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून शाळेत तात्पुरती दुरुस्ती, पाणी फिल्टर, प्रिंटर, झेरॉक्स मशीन, स्टेज आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे नवीन बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी सरपंच विश्वंभर गिरी यांनी केली.

### धोकादायक इमारतीबाबत दरवर्षी अहवाल; तरीही कार्यवाही नाही – मुख्याध्यापक आंधळे

महाजनवाडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून पावसाळ्यात छत गळते, भिंतींचे प्लास्टर कोसळते. ग्रामस्थांनी तात्पुरती डागडुजी केली असली तरी ती अपुरी आहे. शाळेच्या धोकादायक अवस्थेबाबत दरवर्षी पावसाळ्यापूर्वी वरिष्ठ कार्यालयाला अहवाल सादर करण्यात येतो; मात्र अद्याप नवीन इमारतीसाठी कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याची माहिती मुख्याध्यापक आंधळे एस. डी. यांनी दिली.

### महाजनवाडी शाळेची स्थिती एका नजरेत

स्थापना : सन १९५४ पूर्वी, विद्यार्थी संख्या : सुमारे १२५

समस्या : जीर्ण व धोकादायक इमारत, गळके छत, भिंतींचे प्लास्टर कोसळण्याचा धोका

तात्पुरती उपाययोजना : ग्रामस्थांकडून डागडुजी

मागणी : जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून नवीन वर्गखोल्यांचे तातडीने बांधकाम

शाळेच्या वर्गखोल्या गळक्या असून भिंतींचे खपले पडत आहेत. पावसाळ्यात विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत असल्याने तातडीने नवीन इमारतीचे बांधकाम करणे आवश्यक असल्याचे डॉ. ढवळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणारा पिकअप जप्त; ९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**गेवराई । दिव्य रिपोर्टर**

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या कडक आदेशानुसार, गेवराई पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई केली आहे. या मोहिमेत नऊ लाख सहा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१० जुलै २०२६ रोजी गेवराई पोलीस शहरात गस्त घालत असताना, रात्री १२:१५ च्या सुमारास शिवाजीनगर कोल्हेर रोडवर एक संशयास्पद पांढऱ्या रंगाचा अशोक लेलँड 'बडा दोस्त' पिकअप आढळून आला. पोलिसांनी या वाहनाची तपासणी केली असता, त्यात विनापरवाना अवैध वाळूची वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले. पोलिसांनी तत्काळ सदर पिकअप आणि चालकाला ताब्यात घेतले. या कारवाईत जप्त केलेल्या एकूण मालाची किंमत ९,०६,००० रुपये इतकी आहे. पोलीस कॉन्स्टेबल जितेंद्र आत्माराम ओव्हाळ यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४१९/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (भा.न्या.स.) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि अतुलकुमार लांडगे, सपोनि समाधान दौड, पोह कल्याण राठोड, पोकॉ गोरक्ष डोके आणि फिर्यादी जितेंद्र ओव्हाळ यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# आजच्या जगात आणि भारतीय समाजात सामाजिक सलोख्याचे महत्त्व – अबू अब्दुल्ला अहमद

आजचे जग परस्परांशी जोडलेले आणि एकमेकांवर अवलंबून असले तरी ते अनेक स्तरांवर विखुरलेले असून हितसंबंधांच्या संघर्षांनी ग्रासलेले आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही राष्ट्राची ताकद केवळ त्याच्या आर्थिक प्रगतीवर किंवा राजकीय स्थैर्यावर अवलंबून नसते, तर त्या राष्ट्रातील विविध समाजघटक, समुदाय आणि गट यांच्यातील परस्पर संबंध किती सुदृढ आहेत यावरही अवलंबून असते.

भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. ही विविधता त्याची ओळख आणि शक्ती आहे; मात्र त्याच वेळी ती एक संवेदनशील बाबही आहे. अनेक अभ्यासकांच्या मते, भारताचा इतिहास आणि सामाजिक रचना अशी आहे की, समाजात मतभेद निर्माण झाले तर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. तरीही भारताची अनेक शतकांची एकत्र राहण्याची, एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची आणि परस्पर सहकार्याची परंपरा आजही समाजाला एकत्र ठेवण्याची ताकद राखून आहे.

आज पूर्वेकडील अनेक समाज अशाच आव्हानांना सामोरे जात आहेत, ज्यांना विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्त्य समाजांनी तोंड दिले होते. त्या काळात स्वार्थ, सामाजिक दुरावा आणि अस्थिर मानसिकता यामुळे समाजात तणाव वाढला होता. नंतर अनेक विचारवंत, साहित्यिक आणि राजकीय नेत्यांनी संकुचित राष्ट्रवादाऐवजी व्यापक मानवता, सहकार्य आणि जागतिक बंधुभावाची संकल्पना मांडली. परिणामी, पूर्वी परस्परांचे शत्रू असलेले देश आज सहकार्याने पुढे जात आहेत. मध्ययुगात सादी, रूमी यांसारख्या कवींनी आणि विचारवंतांनीही मानवतेचा संदेश दिला. सादी यांचे प्रसिद्ध वचन आहे. आदमाची सर्व संतती एकमेकांचे अवयव आहेत, कारण त्यांची निर्मिती एकाच मूळ तत्त्वापासून झाली आहे.

या विचारांनी समाजात सहजीवन, बंधुभाव आणि मानवी मूल्यांना बळ दिले. आजच्या विद्वानांवरही अशीच जबाबदारी आहे की त्यांनी द्वेष, वैमनस्य आणि सामाजिक विघटनाच्या वातावरणात युवकांना सामाजिक जबाबदारी, एकात्मता आणि सामूहिक हिताचे महत्त्व समजावून सांगावे. समाजातील विविधता ही एकाच वेळी संवेदनशील बाब आणि मोठी ताकद आहे. अशा समाजात परस्पर संवाद, एकमेकांविषयी आदर आणि सहकार्य ही केवळ नैतिक मूल्ये नसून शांतता, विकास आणि स्थैर्याची मूलभूत अट आहेत.

भारत हा तरुणांचा देश आहे. देशाला आपल्या युवकांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. मात्र वाढते वैमनस्य, द्वेष आणि भेदभाव यांमुळे अनेक तरुण परदेशात स्थायिक होण्याचा विचार करत आहेत. याच वेळी युरोप आणि अमेरिका उच्चशिक्षित व कुशल युवकांना आपल्या देशात येण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत, कारण त्यांना माहीत आहे की समाजातील विविधता ही कमकुवतपणा नसून प्रगतीची शक्ती आहे.

सामाजिक सलोखा केवळ सरकारी धोरणांमुळे निर्माण होत नाही. तो दैनंदिन जीवनातील परस्पर संपर्कातून विकसित होतो. शेजाऱ्यांशी संवाद, एकत्र खेळणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्थानिक कार्यक्रमांमध्ये सहभाग आणि सामाजिक ओळखी वाढविणे यामुळे परस्पर विश्वास निर्माण होतो आणि पूर्वग्रह कमी होतात. जे लोक जात, धर्म, भाषा किंवा वंशाच्या आधारावर समाजात दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, ते समाज आणि राष्ट्र दोघांचेही नुकसान करतात.

एकेकाळी भारताकडे पाश्चात्त्य जगात साप-गारुड्यांचा किंवा राजे-महाराजांचा देश म्हणून पाहिले जात होते. आज भारताची ओळख त्याच्या तरुणांच्या बुद्धिमत्ता, परिश्रम आणि कौशल्यामुळे निर्माण झाली आहे. या बदलामागे विचारसरणीतील परिवर्तन आणि परस्पर संवादाची संस्कृती महत्त्वाची ठरली.

समाजशास्त्रज्ञांच्या मते, सामाजिक एकात्मता सातत्यपूर्ण संवाद आणि सहकार्यामुळे निर्माण होते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांना एकत्र आणतात. येथे विद्यार्थी केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर सहजीवन, सहिष्णुता आणि परस्पर आदराची मूल्येही शिकतात. सांस्कृतिक कार्यक्रम, वादविवाद, क्रीडा स्पर्धा आणि समाजसेवेचे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये परस्पर विश्वास वाढवतात. समावेशक मूल्यांचा प्रसार करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. संविधानातील मूल्ये, मानवी प्रतिष्ठा आणि नागरिक कर्तव्यांवर भर देऊन ते विद्यार्थ्यांना पूर्वग्रहांवर मात करण्यास आणि विविधतेचा आदर करण्यास प्रेरित करू शकतात. शिक्षणाने केवळ बौद्धिक प्रगतीच नव्हे, तर सामाजिक जबाबदारी आणि सहानुभूतीही विकसित केली पाहिजे.

कार्यालये आणि कार्यस्थळेही सामाजिक सलोखा वाढविण्याची महत्त्वाची केंद्रे आहेत. विविध समाजघटकांतील कर्मचारी एकत्र काम करताना परस्पर सहकार्य आणि समज वाढवतात. अशा वातावरणात व्यक्तीची क्षमता, प्रामाणिकपणा आणि समर्पण यांना जात, धर्म किंवा ओळखीपेक्षा अधिक महत्त्व मिळते.

जसे आईची कुशी मुलाची पहिली शाळा असते, तसेच गाव आणि परिसर हे सामाजिक जीवनाचे पहिले शिक्षणकेंद्र असतात. स्वच्छता मोहिमा, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा आणि सामुदायिक बैठका यांमुळे सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण होते. स्वच्छता, शिक्षण, आरोग्य किंवा पर्यावरण संरक्षण यांसारख्या स्थानिक प्रश्नांवर लोक एकत्रितपणे काम करतात तेव्हा मतभेद असूनही समान हितसंबंध त्यांना एकत्र आणतात.

सामाजिक सलोख्यासमोरील सर्वात मोठा अडथळा म्हणजे पूर्वग्रह. अज्ञान, चुकीची माहिती, ऐतिहासिक तक्रारी किंवा इतर समाजघटकांशी मर्यादित संपर्क यांमुळे पूर्वग्रह निर्माण होतात. त्यावर मात करण्यासाठी व्यक्ती आणि संस्था या दोन्ही स्तरांवर प्रयत्न आवश्यक आहेत. माध्यमे, शैक्षणिक संस्था, धार्मिक नेते आणि स्वयंसेवी संस्था यांनी योग्य माहिती, विधायक संवाद आणि विविधतेविषयी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करणे गरजेचे आहे.

परस्पर आदर हा सामाजिक सलोख्याचा अत्यावश्यक घटक आहे. आदर म्हणजे प्रत्येक गोष्टीवर सहमती असणे नव्हे; तर प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा आणि मानवता मान्य करणे होय. जेव्हा विविध समुदाय एकमेकांच्या श्रद्धा, विचार आणि सांस्कृतिक परंपरांचा आदर करतात, तेव्हा मतभेद हे संघर्षाचे नव्हे तर समृद्धीचे साधन ठरतात. विश्वास हा वरून लादता येत नाही; तो न्याय, पारदर्शकता, सातत्यपूर्ण संवाद आणि सकारात्मक अनुभव यांच्या आधारावर हळूहळू निर्माण होतो. भारतासह जगभरातील अनेक उदाहरणे दर्शवितात की पूर, भूकंप, महामारी यांसारख्या संकटांच्या काळात लोक धर्म, जात किंवा सामाजिक ओळख न पाहता एकमेकांच्या मदतीसाठी धावून येतात. खऱ्या अर्थाने सुसंवादी समाज तोच असतो, जिथे विविधतेचा आदर केला जातो, तिचा आनंद साजरा केला जातो, मतभेदांचा सन्मान राखला जातो आणि रंग, वंश, भाषा किंवा धर्म यापलीकडे जाऊन प्रत्येक व्यक्तीकडे एका मोठ्या मानवी कुटुंबाचा समान सदस्य म्हणून पाहिले जाते.हा अनुवाद मूळ उर्दू लेखाचा आशय आणि विचार शक्य तितक्या अचूकपणे मराठीत मांडतो.

# गुत्तेदार व अधिकाऱ्यांनी माजविला भ्रष्टाचाराचा कहर




## एलईडी, सौर पथदिवे व पेव्हरब्लॉकच्या कामातून प्रशासनाचा गेम केल्याची शंका

**शिरूर तालुक्यात केतुरा गावात बसविले दोन लाख ६० हजारांचे एलईडी व सौर पथदिवे, चुकीच्या वर्कऑर्डरमधून होणार त्या एजन्सीची पोलखोल**

**एकाच गावात एकाच कामासाठी आमदार निधी, २५१५ मधून कामे, डीपीडीसीचा निधी, समाजकल्याणमधील निधी, अल्पसंख्याक निधी खर्च करून मोठा भ्रष्टाचार झाल्याची चर्चा, चौकशीत मोठी खळबळ होण्याची शक्यता**






# जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागातून संयुक्त बोगसगिरी झाल्याचे चित्र, एसआयटी चौकशीची गरज




ग्राऊंड रिपोर्टर
दिव्य आधार
शेख रिजवान
9561840184



**मागील तीन ते चार वर्षात साखरे बोरगाव, गोगलवाडी, रौळसगाव, अंधापुरी घाट, ससेवाडी, काठोडा, अंथरवन पिंप्री, सारूकवाडी या ग्रामपंचायतीत जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग, समाजकल्याण या तिन्ही विभागातून इलेक्ट्रीक व पेव्हरब्लॉकचे कामे करून निधीची विल्हेवाट लावल्याचे चित्र, संयुक्त चौकशीची गरज**

**वरील ग्रामपंचायतीत ज्या एजन्सीने, ज्या शासकीय गुत्तेदाराने किंवा ज्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी कामे केलेली आहेत अशा सर्वांची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे असून जर पारदर्शक चौकशी झाली तर मोठी पोलखोल होण्याची शक्यता, इतर काही एजन्सीचे पितळ उघडे पडण्याचे चान्स**

बीड :

जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग व समाजकल्याण विभागातून विविध गावात आमदार निधी, २५१५ चा निधी, दलित वस्तीचा निधी, अल्पसंख्याक निधी अशा विविध योजनेतून विविध ग्रामपंचायतमध्ये मोठ्या प्रमाणात कामे झाल्याची माहिती मिळाल्यानंतर ती कामे दर्जेदार झाली का? याचा पाठपुरावा करत असताना इतर अनेक बाबी समोर आल्या. मिळालेल्या माहितीनुसार काही गुत्तेदारांनी अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून प्रशासनाचाच गेम केल्याचे या माहितीतून समोर आल्यानंतर दिव्य आधारने या प्रकरणी पाठपुरावा केल्यानंतर अनेक गंभीर बाबी समजून आल्या. जिल्हा परिषदमधून जी कामे झाली होती तिच कामे सार्वजनिक बांधकाम विभाग व समाजकल्याणमधून मंजूर करून घेवून मोठा भ्रष्टाचार केल्याचे दिसून येत असून एकाच गावात एकाच कामासाठी आमदार निधी, २५१५ चा निधी, दलित वस्तीचा निधी, अल्पसंख्याक निधी खर्च करण्यात आल्याचे यातून स्पष्ट दिसून येत असले तरी या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी केली तर अनेक काम करणाऱ्या एजन्सीची पोलखोल होणार यात काही शंका नाही. विशेष म्हणजे या दुटप्पी कार्यक्रमामुळे प्रशासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लागल्याचे दिसून येत असून इलेक्ट्रीक कामातून व पेव्हरब्लॉकमधून ही बोगसगिरी काही एजन्सीने केल्याची चर्चा जोरात आहे. बीड तालुक्यातील साखरे बोरगाव, गोगलवाडी, रौळसगाव, अंधापुरी घाट, ससेवाडी, काठोडा, अंथरवन पिंप्री, सारूकवाडी या ग्रामपंचायतीत झालेल्या कामातून प्रशासनाचा गेम केल्याचे दिसून येत असून वरील तिन्ही विभागातील कामाच्या या चौकशीसाठी संयुक्त समिती गठीत करणे किंवा एसआयटीमार्फत याची चौकशी करणे अपेक्षित आहे. विशेष म्हणजे काही गावाची लोकसंख्या अत्यंत कमी आहे, विशेष म्हणजे घराचीही संख्या कमी आहे, अशा गावातही लाखो रुपयांचा निधी खर्च करून संबंधित एजन्सीने काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने ही बोगसगिरी केल्याचे स्पष्ट दिसून येत असून जर या प्रकरणाची पारदर्शक चौकशी झाली तर अनेक सत्य बाबी समोर येतील यात काही शंका नाही.दुसरे अत्यंत महत्त्वाचे असे की, जे गाव तालुक्यात नाही अशा गावाचे वर्कऑर्डर आणून बोगस बिले उचलल्याचेही दिसून येत असून एकंदरीत मागील तीन ते चार वर्षांत इलेक्ट्रीक कामातून व पेव्हर ब्लॉक कामातून मोठी बोगसगिरी झाल्याचे दिसून येत असून एकाच गावात एकाच कामासाठी विविध निधी खर्च करून संबंधित एजन्सीने प्रशासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावल्याचे दिसून येत असून यासाठी पारदर्शक चौकशी होणे गरजेचे वाटते.

उस्मानाबाद विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी २०२१ साली शिरूर तालुक्यातील केतुरा गावात एलईडी व सौर पथदिवे बसविण्यासाठी एका एजन्सीच्या नावाने २ लाख ६० हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून वर्कऑर्डर दिले होते. संबंधित एजन्सीने शिरूर तालुक्यातील केतुरा गावात २ लाख ६० हजार रुपयांचे एलईडी व सौर पथदिवे बसवून या कामाचे बिलही उचलले. ज्याअर्थी शिरूर तालुक्यात केतुरा नावाचे गावच नाही तरीही दिव्य आधारच्या प्रतिनिधीने आताचे बीडीओ यांना व्हॉटसअ‍ॅपवरून शिरूर तालुक्यात केतुरा गाव कुठे आहे? यासंदर्भात विचारणा केल्यानंतर उपस्थित बीडीओ यांनी केतुरा गाव हे फक्त बीड तालुक्यात आहे, शिरूर तालुक्यात केतुरा नावाचे कोणतेच गाव नाही असे स्पष्ट सांगितले. तर मग संबंधित एजन्सीने २०२१ या वर्षी निघालेल्या वर्कऑर्डर नुसार कोणत्या केतुरा गावात काम केले? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून जर शिरूर तालुक्यात केतुरा गावच नव्हते तर बीड विद्युत विभागातील शाखा अभियंता व उपअभियंता यांनी संबंधित एजन्सीला दोन लाख ६० हजार रुपयांचे बिल कसे दिले? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले असून संबंधित एजन्सीला अधिकारी मॅनेज असल्याचे यातून स्पष्ट दिसून येते. कदाचित उस्मानाबाद विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी चुकीने शिरूर तालुक्यातील केतुरा गावाने वर्कऑर्डर काढले असतील, नियमाने बीड विद्युत विभागाने या प्रकरणी संबंधित अधिकारी यांना झालेली चुक निदर्शणास आणून देणे अपेक्षित होते परंतु बीडच्या काही अधिकाऱ्यांनी संगनमत करून



बीड

विषय :- . अ.प.क्र.१४५३/२०-२१ केतुरा ता.शिरुर कासार जि.बीड गांव अंर्तगत एल ई.डी. सौर पथदिवे बसवीणे..रु.२६०४४३/-

संदर्भ :- १) आपले निविदा दिनांक :- १६/०२/२०२१.
२) करारनामा क्र. ब-१/ ३९ /२०२०-२०२१

महोदय,

आपल्या वरील कामाचे निविदा ०.०१% (शून्य पॉईन्ट शुन्य एक टक्के) कमी अंदाजपत्रकीय दराप्रमाणे रू. २६०४१७/- ( दोन लाख साठ हजार चारशे सत्तरा फक्त) स्विकारण्यात आलेली असुन आपण हे काम उपअभियंता, सा. बां. विद्युत उपविभाग, लातूर यांचेशी संपर्क साधुन त्वरीत सुरू करावे व ते काम हा कार्यादेश निर्गमीत झालेल्या दिनांकापासून ३० दिवसात पुर्ण करावे.

वरील कामाला लागणारे विद्युत साहित्य पत्रासोबत जोडलेल्या मंजूर विद्युत साहित्याच्या यादीप्रमाणे असावयास पाहिजे. जे विद्युत साहित्य पत्रासोबत जोडलेल्या मंजूर यादीत समाविष्ठ नसेल ते विद्युत साहित्य वरील कामावर वापरण्यापुर्वी खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

वरील विद्युत काम पुर्ण झाल्यास म. रा. वि. मंडळाचा आवश्यक चाचणी अहवाल उपअभियंता, सा. बां. विद्युत उपविभाग, बीड यांचेकडे त्वरीत सादर करावा. दर अनुसुची प्रत, नकाशे आपल्या माहितीस्तव या पत्रासोबत जोडलेले आहे. आपल्या कडून काम पुर्ण झाल्यावर या पत्रासोबत जोडलेल्या नकाशावर लाल शाईने झालेल्या कामाचे आरेखन करून तो नकाशा उपअभियंता, सा. बां. विद्युत उपविभाग, बीड यांचेकडे सुपुर्द करावा.

(टिप:-सदरील काम चालू करण्यापुर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर स्थळदर्शक फोटोकाढूण कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. )

सोबत :- १) दर अनुसुची प्रत
२) नकाशा (परत करणे.)
३) मंजूर साहित्याची यादी.

आपला विश्वासु,

कार्यकारी अभियंता
सा. बां. विद्युत विभाग, उस्मानाबाद

शिरूर तालुक्यातील केतुरा गावात एलईडी व सौर पथदिवे लावण्यासाठी दिलेले हेच ते कार्यारंभ आदेश

## जावक क्रमांकात तफावत तर तांत्रिक मान्यता तपासण्याची गरज

जिल्हा परिषद शिक्षण प्राथमिक विभागाच्या वतीने साहित्य पुरवठ्याची कामे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मंजूर होवून कार्यारंभ आदेशासहीत चालू व पूर्ण रित्या झाली आहेत. संबंधित कामे होत असताना व झाल्यानंतर देखील मोठ्या प्रमाणात कामाच्या गुणवत्तेबाबतीत प्रश्न उपस्थित झाले होते, तसेच संबंधित कंत्राटदाराने गुणवत्तेच्या बाबतीत शासनाच्या कोणत्याही परिपत्रकाचा अवलंबन केल्याचे दिसून येत नाही. नियमोचितरित्या सर्व अनियमिततेची व निकृष्ट कामाची स्तरनिहाय चौकशी होणेबाबत त्रिसदस्यीय समिती आदेशित करणे गरजेचे असून दोन विविध कार्यारंभ आदेशासाठी जावक क्रमांक दोन्ही कार्यारंभ आदेशावर एकच जावक क्रमांक वापरण्यात आलेला आहे. तसेच जी चार कामे झाली होती त्यातील तांत्रिक मान्यता देखील संशयास्पद असून या सर्वांची चौकशी होणे गरजेचे वाटते.

## २०२४ या साली ग्रामपंचायतीत इलेक्ट्रीक व पेव्हर ब्लॉकसाठी एक कोटीचा निधी खर्च

सन २०२४ या वर्षी महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विभाग ग्रामक्षेत्र विकास योजनेतून अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान वितरित करण्यास मंजूरी दिली आहे. सदरील निधी तहसीलदार सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या खात्यामध्ये आहरण करण्यात आला असून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांनी खालील मंजूर कामास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर केलेला आहे. यात साखरे बोरगाव येथील राजासाय दर्गाह येथे पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी दहा लाख रुपये, साखरे बोरगाव येथील राजासाय दर्गाह येथे परिसर सुशोभीकरण करण्यासाठी दहा लाख रुपये, पुन्हा साखरे बोरगाव राजसाय दर्गाह येथे परिसर पोलसह एलईडी बसविण्यासाठी दहा लाख रुपये अशाप्रकारे ३० लाख रुपयांचा निधी साखरे बोरगाव येथे देण्यात आला होता. त्यानंतर मौजे रौळसगाव अंतर्गत गोगलवाडी येथील सुलतान साहेब पीर येथे सुशोभीकरण करण्यासाठी दहा लाख रुपये, मौजे रौळसगाव अंतर्गत गोगलवाडी, सुलतानसाहेब पीर येथे सिमेंट रस्ता तयार करण्यासाठी दहा लाख रुपये, पुन्हा रौसळगाव अंतर्गत गोगलवाडी सुलतानसाहेब पीर येथे परिसरामध्ये एलईडी बसविण्यासाठी दहा लाख रुपये त्यानंतर मौजे काठोडा पीर परिसरामध्ये पोलसह एलईडी बसविण्यासाठी दहा लाख रुपये, मौजे काठोडा पीर परिसरमध्ये सुशोभीकरण दहा लाख रुपये, त्यानंतर मौजे सारूकवाडी बंधी नायाज पीर परिसरामध्ये पोलसह एलईडी बसविण्यासाठी दहा लाख रुपये, मौजे अंधापुरी घाट पीरसाहेब समोर पेव्हरब्लॉक बसविण्यासाठी दहा लाख रुपये अशाप्रकारे एकूण एक कोटी रुपये या कामावर खर्च करण्यात आला. आता याच गावात याच कामासाठी जिल्हा परिषद किंवा समाजकल्याणमधून निधी घेण्यात आला होता का? किंवा आमदार फंडातून, २५१५ मधून दलित वस्तीमधून याठिकाणी कामे झाली होती का? याची चौकशी करणे गरजेचे वाटते.

## त्या एजन्सीने असा केला तिन्ही विभागातील शाखा अभियंताचा गेम

जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम व समाजकल्याण विभागातून एकाच कामासाठी निधी घ्यायचा आणि एक काम करून तिन्ही विभागातील अधिकाऱ्यांची फसवणूक करायची असा त्या एजन्सीचा फंडा होता. उदा.जिल्हा परिषदमधून एखाद्या गावात पेव्हरब्लॉक किंवा एलईडी व सौर पथदिव्याचे काम करायचे, पुन्हा त्याच गावासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व समाजकल्याणमध्ये निधीची मागणी करायची. काही अधिकारी त्या एजन्सीला मॅनेज असल्याने या सर्व बाबी गुप्तपणे पार पाडत असे. त्यानंतर जिल्हा परिषदमधून केलेले काम प्रथम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना घेवून जावून दाखवायचे, त्यानंतर पुन्हा तेच काम समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना दाखवायचे, अशाप्रकारे त्या एजन्सीने तिन्ही विभागातील अधिकाऱ्यांचा गेम केल्याची शंका असून जर याप्रकरणी एसआयटी चौकशी स्थापन झाली तर फक्त याच कामात नव्हे तर अनेक कामात संयुक्त बोगसगिरी झालेली उघडकीस येईल.

**शिरूर तालुक्यात केतुरा नावाचे कोणतेच गाव नाही परंतु उस्मानाबाद विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी शिरूर तालुक्यातील केतुरा गावात एलईडी व सौर पथदिवे बसविण्यासाठी २ लाख ६० हजारांचा निधी उपलब्ध करून एका एजन्सीच्या नावाने वर्कऑर्डर दिले., ज्याअर्थी शिरूर तालुक्यात केतुरा गावच नाही तर मग त्या एजन्सीने कोणत्या केतूरा गावात काम केले? याचीही चौकशी होणे गरजेचे**

**शिरूर तालुक्यात केतुरा गाव असल्याचे दाखवून संबंधित एजन्सीने दोन लाख ६० हजार रुपयांचे बोगस बिले उचलल्याची मिळाली माहिती, बीड विद्युत विभागातील शाखा अभियंता व उपअभियंता त्या एजन्सीला मॅनेज असल्याची शंका, म्हणूनच बोगस कामाचे बिल पेड झाले**

**गोगलवाडी गावाची लोकसंख्या अत्यंत कमी, अंदाजे ३० ते ३५ घरे परंतु इलेक्ट्रीक कामासाठी व तेथील दर्गाहच्या सुशोभीकरणाच्या नावावर लाखो रुपयांचा खर्च तर साखरे बोरगाव येथेही इलेक्ट्रीक कामे, पेव्हरब्लॉकची कामे करण्यासाठी विविध विभागातून निधी उपलब्ध करून अनेक योजना गावात राबविल्याची शंका**

**जिल्हा परिषदमधून पेव्हर ब्लॉक व इलेक्ट्रीक कामे मंजूर करून घ्यायची, ती कामे करायची, नंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, समाजकल्याण विभागातूनही त्याच गावात पेव्हरब्लॉक व इलेक्ट्रीकच्या कामाला प्रशासकीय मान्यता घ्यायची, जिल्हा परिषदमधून झालेली कामे सार्वजनिक बांधकाम विभागातून व समाजलकल्याणमधून मिळालेल्या निधीतून केल्याचे दाखवून निधी हडप करायचा, अशाप्रकारे संयुक्त भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत असून याप्रकरणी प्रशासनाने एसआयटी चौकशी बसविण्याची गरज**

बोगस बिले संबंधित एजन्सीला टक्केवारी घेवून दिल्याची शंका व्यक्त केली जात असून हे प्रकरण जरी चार वर्षांपूर्वीचे असले तरी संबंधित एजन्सीला पत्रव्यवहार करून अधिकाऱ्यांनी त्या एजन्सीची चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच अशा अनेक एजन्सी आहेत की, ज्यांनी एकाच कामासाठी जिल्हा परिषदमधून व इतर विभागातूनही निधी घेवून प्रशासनाचा गेम केल्याचे दिसून येत असून जर या प्रकरणी एसआयटी चौकशी समिती स्थापन झाली तर अनेक एजन्सीची पोलखोल तर होणारच, जर बोगस कामांची रिकव्हरी झाली तर प्रशासनाला यातून मोठा फायदा होणार परंतु यासाठी पारदर्शक चौकशी होणे अपेक्षित आहे.

# बाजारभावाने जप्त मालमत्तेचा लिलाव करा; ठेवीदारांचा प्रत्येक रुपया परत द्या : मुख्यमंत्री

## बीडमध्ये विशेष न्यायालय उभारण्याची घोषणाही; विधानभवनातील उच्चस्तरीय बैठकीत तपास यंत्रणांना स्पष्ट निर्देश

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील आर्थिक दिवाळखोरीत गेलेल्या मल्टिस्टेट संस्था, पतसंस्था आणि अर्बन बँकांच्या लाखो ठेवीदारांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय गुरुवारी मुंबईतील विधानभवनात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत घेण्यात आला. एमपीआयडी कायद्यांतर्गत जप्त करण्यात आलेल्या सर्व मालमत्तेचे खासगी तज्ञ संस्थेमार्फत बाजारभावानुसार मूल्यांकन करून त्यांचा लिलाव करावा आणि त्यातून मिळणाऱ्या रकमेतून ठेवीदारांच्या ठेवी परत करा. ठेवीदारांचा एकही रुपया बुडणार नाही याची खात्री करावी असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

विधानभवनात गुरुवारी (दि. ९) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत बीड जिल्ह्यातील बुडीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांच्या प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत राज्यमंत्री पंकज भोईर, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार सुरेश धस, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, रोहित पवार, खासदार बजरंग सोनवणे, डॉ. ओमप्रकाश शेटे, अक्षय मुंदडा, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत,ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय आणि तपास यंत्रणांचे अधिकारी, सीआयडी व ईडीचे वरिष्ठ अधिकारी, उपस्थित होते. तर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि संबंधित लिक्विडेटर यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग बैठकीत सहभाग नोंदविला.

बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट, जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन तसेच मराठवाडा अर्बन (माजलगाव) यांसारख्या



आर्थिक संस्था दिवाळखोरीत गेल्याने मराठवाड्यातील लाखो ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक अडकली आहे. या प्रकरणात एमपीआयडी कायद्यांतर्गत अनेक मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून, त्यांच्या लिलाव प्रक्रियेला गती देण्यावर बैठकीत भर देण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी जप्त केलेल्या मालमत्तांचे सरकारी दराऐवजी विद्यमान बाजारभावानुसार मूल्यांकन करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले. मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर पारदर्शक पद्धतीने लिलाव प्रक्रिया राबवून त्यातून मिळणारी रक्कम प्राधान्याने ठेवीदारांना वितरित करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**आमदारांसह उबाळेंनी पतसंस्थांच्या कारभाराचा वाचला पाढा**

आमदार सुरेश धस, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर, ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा. सचिन उबाळे यांनी बैठकीत बुडीत संस्थांच्या कारभाराची माहिती मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. अनेक वर्षांपासून आंदोलने, मोर्चे आणि निवेदनांच्या माध्यमातून ठेवीदारांच्या न्यायासाठी सुरू असलेल्या लढ्याचाही त्यांनी आढावा दिला. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रकरण गांभीर्याने घेत संबंधित यंत्रणांना तातडीने पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

**बीडमध्ये विशेष न्यायालयाची घोषणा**

या बैठकीतील आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. तो म्हणजे बीड येथे विशेष न्यायालय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली. सध्या जप्त मालमत्तांच्या लिलावासाठी न्यायालयीन परवानगी मिळण्यास मोठा कालावधी लागत असल्याने संपूर्ण प्रक्रियेसाठी मोठा वेळ लागतो. विशेष न्यायालय सुरू झाल्यानंतर अशा प्रकरणांवरील सुनावणी आणि लिलावासंदर्भातील परवानगी बीडमध्येच मिळू शकतील. त्यामुळे तपास, न्यायालयीन प्रक्रिया आणि ठेवीदारांना पैसे परत मिळण्याची गती वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

ठेवीदारांच्या न्यायासाठी कायम लढा देणारे ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे हे पायाला दुखापत झालेली असतानाही गुरुवारी विधानभवनातील महत्त्वाच्या बैठकीला आवर्जून उपस्थित राहिले. चालताना त्रास होत असूनही लाखो ठेवीदारांच्या पैशांचा प्रश्न मार्गी लागावा, या एकाच ध्येयाने त्यांनी बैठकीत सहभाग घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर ठेवीदारांची बाजू ठामपणे मांडली. त्यांच्या या जिद्दीची आणि ठेवीदारांप्रती असलेल्या बांधिलकीची बैठकीत उपस्थितांनीही दखल घेतली.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.